## कॉफी

***Coffea arabica*** L. Family - **Rubiaceae**

**विविध भाषांमधील नावे:** कॉफीला तुर्की भाषेत 'काहव्हेह' (Kahveh) म्हणतात, त्यावरून अरबी 'काहवाह' (Qawah, Kahvah) संस्कृतात 'कटु' म्हणतात. 'करूआ' हा शब्दही हिंदूंच्या वापरात आहे. उदा., चिनी : कैफी (Kai-fey) जपानी : कीही (kehi) रशियन : कोफे (Kophe) पर्शियन : कीह्व्ही (qehve) लॅटिन : कॉफिया .

**Morphology:**

Large erect shrubs; young branches pubescent. Leaves elliptic, opposite, margin undulate, shiny on upper surface and paler on lower surface. Flowers axillary. Seeds planoconvex.





### वनस्पतीचे वर्णन:

कॉफी या सदाहरित लहान वृक्षाची वा झुडपाची उंची ४-६ मी. पर्यंत असते; परंतु त्याची उंची मुद्दाम ४ मी. पेक्षा कमी ठेवतात. पाने गर्द हिरवी, समोरासमोर, साधी व चकचकीत असतात. पानांच्या मध्ये झुपक्याने पांढरी सुवासिक फुले येतात. कॉफीची मृदू फळे अंडाकृती, मध्यभागी खाच असलेली असून साधारण १-५ सेंमी. लांबीची असतात. फळे कच्ची असताना हिरवी व पिकल्यावर पिवळ्या रंगाची दिसतात. सुकल्यानंतर ती किरमिजी होऊन नंतर काळी पडतात. फळे पिकण्यास साधारण ७ ते ९ महिने लागतात. फळात प्रत्येकी दोन बिया असतात. बियांची एक बाजू सपाट तर दुसरी फुगीर असते.

बिया भाजतात व त्या दळून पूड बनवितात. हे एक पेय आहे. कॉफी हे जगभर खप असलेले, तरतरी आणणारे, खास चव आणि स्वाद असलेले एक उत्तेजक पेय आहे. रुबिएसी कुलातील कॉफिया प्रजातीमध्ये असलेल्या वृक्षांच्या फळांतील बियांपासून कॉफीची भुकटी बनवितात. या जातींची लागवड जगाच्या विविध भागांत होते.

**बहर येण्याचा कालावधी:** फेब्रुवारी आणि मार्च

### औषधी उपयोग:

बियांमधील कॅफीन घटक तरतरी आणण्यास उपयुक्त ठरतो, असे कालांतराने संशोधकांनी सिद्ध केले. अतिरिक्त चरबी जाळण्यासाठी कॉफीचा उपयोग होतो. कॉफीमधील कॅफीन या अल्कलॉइडामुळे मज्जासंस्था उत्तेजित होते. या उत्तेजनामुळे श्वासोच्छवास, रक्ताभिसरण, चयापचय व उत्सर्जन यांचा वेग वाढतो. म्हणून या पेयाच्या सेवनामुळे तरतरी आल्यासारखे वाटते. पण काहींच्या बाबतीत कॉफीमुळे बद्धकोष्ठतेसारखे विकार उद्भवतात. अफू, अल्कोहॉल आणि इतर मादकपदार्थांमुळे झालेल्या विषबाधेवर कडक कॉफी एक प्रभावी इलाज आहे.

**लागवड:**

कॉफी ची लागवड बियांपासून केली जाते. रोपवाटिकेमध्ये तयार केलेली रोपे उंच बांधांवर लावली जातात. जिथे दिवसातून ठरावीक वेळ सूर्यप्रकाश जमिनीवर पडतो अशा अर्थात पन्नास टक्के ऊ न सावली असलेल्या ठिकाणी कॉफीची रोपे दोन रोपांमधे पाच फूट अंतर ठेवून दोन फूट बाय दोन फूट आकाराचा खड्डा घेऊन लागवड करावी. बांधावर स्थिरावल्यानंतर अंदाज आणि अनुभव घेऊन मुख्य शेतात कॉफी लागवड करता येईल. कॉफीची रोपे लावल्यापासून तीन वर्षांत उत्पादन सुरु होते. सुरुवातीला एका रोपापासून दोनशे ते पाचशे ग्रॅम बियाणे मिळते. झाडाची वाढ होत जाईल तसे उत्पादनही जास्त मिळत जाते.